पोषण अभियान कार्यक्रमाअंतर्गत मुख्यसेविका/ पर्यवेक्षिका /अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका यांना मोबाईल फोन खरेदी करुन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१८/प्र.क्र. २०५ /का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा : - १ महिला व बाल विकास विभाग,शा.नि.क्र.२०१८/प्र.क्र.२७ /का.६,दिनांक ११ जुलै २०१८
२) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक एबाविसेयो/पोषण अभियान/मोबाईल/२०१९/३१८/,दिनांक २४/०१/२०१९
३) उच्चाधिकार समितीची मान्यता दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेली बैठक.

प्रस्तावना :-

पोषण अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या प्रशासकीय मान्यतेनुसार फेज १ व फेज २ अंतर्गत राज्यातील ३० जिल्हयांमधील ८५४५२ अंगणवाडी केंद्रामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यास दिनांक ११ जुलै २०१८ च्या शासन निर्णयाअन्वये मान्यता दिलेली आहे. पोषण अभियानाअंतर्गत Information Computers Technology Enabled Real Time Monitoring (ICT-RTM) या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत असून सदर उपक्रमाच्या अंमलबजावणी अंतर्गत सर्व अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका ,मुख्यसेविका, पर्यवेक्षिका आणि जिल्हास्तर व प्रकल्प कार्यालयातील तांत्रिक मनुष्यबळासाठी ॲन्ड्राईड बेस्ड मोबाईल फोन व सिमकार्ड डाटा प्लॅन सह उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिलेली आहे.

२ केंद्र शासन, महिला व बाल विकास विभागाचे पत्र क्र. F.No. WBP-२७/१/२०१७- WBP दि. १० डिसेंबर, २०१८ अन्वये पोषण अभियान उपक्रम सर्व राज्यात सन २०१८-१९ पासून राबविण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ३६ जिल्हे, ५५३ प्रकल्प, ३८९९ मुख्यसेविका/पयवेक्षिका व सर्व अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका + ५ % (अतिरिक्त) याप्रमाणे १२०३३५ मोबाईल फोन खरेदी करणे आवश्यक आहेत. त्यासाठी आयुक्तालयाने तातडीने GeM पोर्टलवर कमी कालावधीची ई-निविदा प्रक्रिया प्रसिध्द केली होती. निविदेतील सर्व अटी शर्तींची पुर्तता ३ निविदा धारक करीत असल्याने त्यांना तांत्रिकदृष्टया व्यापारी लिफाफा उघडण्यासाठी समितीने पात्र ठरविलेले आहेत. तत्पूर्वी GeM प्रणालीमार्फत निविदाधारकाचे नांव घोषित न करता L१ चे दर रु. ९,४९०/- दर्शविण्यात आलेले होते. मा.उच्चाधिकार समिती व मा.सचिव (म व बा वि.) यांचे निर्देशानुसार सदर निविदाधारकांचे व्यापारी लिफाफे न उघडता GeM प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने रिव्हर्स ऑक्शन ची प्रक्रिया दि. १८/०१/२०१९ ते २३/०१/२०१९ पर्यंत राबविण्यात आलेली आहे. रिव्हर्स ऑक्शनची प्रक्रिया दि.२३/०१/२०१९ रोजी दुपारी ११.०० वाजता पुर्ण झालेली असून या अंतर्गत मे.**सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा. लि. या निविदाधारकांचे दर इतर निविदाधारकांच्या दराच्या तुलनेने कमी म्हणजे रुपये ८८७७/- प्रति नग असल्याने ते GeM प्रणालीमार्फत L१ निविदाधारक म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत**. मे.सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा.लि. या L१ निविदाधारकाकडून पुढीलप्रमाणे मोबाईल खरेदीचा प्रस्ताव आयुक्तालयाने सादर केलेला होता.

अ. क्र.	L१ निविदाधारकाचे नांव	मॉडेलचे नांव व क्रमांक	खरेदी करावयाच्या मोबाईल फोनची संख्या	प्रति नग किंमत (सर्व करासहित)	एकुण खरेदीची किंमत
१	मे. सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा. लि.	Panasonic Eluga I७	१२०३३५	रु ८८७७/-	रु १०६,८२,१३,७९५/-
	एकुण				**रु १०६,८२,१३,७९५/-**

३. निविदा सूचना तयार करणे, तपशिलवार वैशिष्टयांना अंतिम स्वरुप देणे, तांत्रिक निविदा उघडणे व छानी करणे इ.प्रक्रिया आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवायोजन,नवी मुंबई यांनी पार पाडलेली आहे. शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रकरण राज्यस्तरीय खरेदी समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यासाठी दिनांक २९/१/२०१९ रोजी दुपारी २.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर बैठकीत **मे.सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा.लि. या** L१ निविदाधारकांशी दर कमी करण्याबाबत वाटाघाटी करण्याबाबत चर्चा करण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांना सांगण्यात आले होते. त्यानुसार आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांनी दिनांक ३१/१/२०१९ रोजी संबधित L१ धारकाशी चर्चा केली असून त्यांनी रुपये ८८७७/- यापेक्षा कमी दर करण्यास नकार दिलेला असल्याचे उपरोक्त पत्रान्वये कळविले आहे.

४. केंद्र शासनाकडून सेविकांना मोबाईल तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत वारंवार पाठपुरावा होत आहे. दिनांक ५ फेब्रुवारी २०१९ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत मोबाईल तातडीने सेविकांना उपलब्ध करुन देण्याबाबत पुन्हा सूचना देण्यात आलेल्या आहेत. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५ फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत (HPC) बैठकीत **मे.सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा.लि. या** L१ निविदाधारकाकडून मोबाईल खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे. मे. सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा. लि .यांच्याकडून मोबाईल खरेदी करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

पोषण अभियानाअंतर्गत Information Computers Technology Enabled Real Time Monitoring (ICT-RTM) या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सर्व अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका ,मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांना ॲन्ड्राईड बेस्ड मोबाईल फोन केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ३६ जिल्हे, ५५३ प्रकल्प, ३८९९ मुख्यसेविका/पयवेक्षिका व सर्व अंगणवाडी सेविका- ९७४७५ व मिनी अंगणवाडी सेविका १३०११ अशा एकुण १,१४,३८५ सेविकांना (केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ५% अधिक) मोबाईल फोन **मे. सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा. लि** यांच्याकडून प्रतिनग सर्व करासहित ८८७७/- याप्रमाणे एकुण १,२०,३३५ नग रुपये १०६८२.०० लाख (रुपये एकशे सहा कोटी ब्याऐंशी लाख फक्त) इतक्या खर्चास शासन मंजूरी देत आहे.

२. **मोबाईल पुरवठयाबाबतच्या यासंदर्भातील अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील.**

१) सदर खरेदी करतांना दरपत्रकातील अटी व शर्तीचे पालन तंतोतंत करावे. तसेच दरकरारपत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे (Specification प्रमाणे) पुरवठा केला जाईल याची दक्षता आयुक्त, तथा राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी घ्यावी.

२) सदरचा निधी शासनाच्या विहित धोरणानुसार व कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येईल.

३) पुरवठादाराने वरीलप्रमाणे वरील वस्तुंचा पुरवठा प्रकल्पस्तरापर्यंत करावा. पुरवठाधारकाकडून साहित्य विहित कालावधीत संबंधितांना प्राप्त होण्यासाठी पुरवठा करण्याचा अंतिम दिनांक पुरवठाधारकास बंधनकारक करण्यात यावा.

४) वरील वस्तूंचा पुरवठा उपलब्ध तरतूदीतून विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावा. पुरवठादाराने मागणीप्रमाणे विहित प्रमाणात, विहित केलेल्या गुणवत्तेनुसार वरील वस्तूंचा प्रकल्प स्तरापर्यंत पुरवठा केला आहे. याबाबतची खात्री करण्यात यावी. तसेच सदर पुरवठा केलेल्या बाबीवर पोषण अभियान उपक्रमातंर्गत वापरासाठी / शासनामार्फत पुरवठा असा शिक्का मारलेला किंवा लेबल लावलेला असावा. वरील वस्तूंचे वाटप / पुरवठा व खर्च यामध्ये अनियमितता झाल्यास व लेखा आक्षेप उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयुक्त तथा राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

५) आयुक्त तथा राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी वाटप करावयाच्या साहित्यापेक्षा ५% अधिक खरेदी केलेल्या साहित्याची नोंद कार्यालयाच्या जडसंग्रह नोंदवहीत घ्यावी. तसेच खरेदी केलेल्या व वाटप केलेल्या साहित्याची नोंद ठेवावी.

६) मोबाईल वापराबाबतच्या सर्वसाधारण सूचना आयुक्त तथा राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी त्यांच्यास्तरावर निर्गमित कराव्यात.

७) हया योजनेचा लाभ लाभार्थ्यांना पोहचावा, याद्दष्टीने स्वयंस्पष्ट माहिती अंगणवाडीतील नोंदवहीमध्ये उत्पादनाचा दिनांक / एकूण पुरवठा / एकूण उपयोग याबाबतची योग्य नोंद ठेवणे, इत्यादी बाबत उचित मार्गदर्शक सूचना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी द्याव्यात.

८) सदर आदेशानुसार प्रत्यक्षात प्रत्येक प्रकल्प स्तरावर पुरवठा झालेला आहे, याची खात्री झाल्यावरच प्रकल्पनिहाय देयक अदा करण्यात यावे. यासाठी आयुक्त, तथा राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई हे जबाबदार राहतील.

९) मोबाईल साहित्य पुरविण्याबाबत विलंब झाल्यास,साहित्याच्या दर्जा बाबत काही तक्रार असल्यास त्याचे निवारण मे.सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा. लि कंपनीकडून करुन घेण्यात यावे.

३. या प्रयोजनासाठी होणारा केंद्र हिश्याचा खर्च मागणी क्र.एक्स-१, २२३६- पोषण आहार, (०२) -पोषक अन्न व पेये वितरण,१०१-विशेष पोषण आहार कार्यक्रम (११) पोषण अभियान (११) (०१) पोषण अभियान **केंद्र हिस्सा (८०%) (२२३६ २०८४)- ५० इतर खर्च** व मागणी क्र.एक्स-१, २२३६- पोषण आहार, (०२) -पोषक अन्न व पेये वितरण,१०१-विशेष पोषण आहार कार्यक्रम (११) पोषण अभियान (११) (०२) पोषण अभियान **राज्य हिस्सा** (२०%) **(२२३६ २०९३) - ५० इतर खर्च** या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षी मंजूर व उपलब्ध असलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय उच्चाधिकार समितीच्या दिनांक ५ फेब्रुवारी २०१९ रोजी मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२८१५०२२१४१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINITA VED SINGAL

Digitally signed by VINITA VED SINGAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=df64f63ee52f1faf8b406f825c358391702d61c47fee432e9106486eb53c4867, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a1d52427a2acd827d0c5733431ed650d5cae8020c5730ba60883661c3be91486, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=VINITA VED SINGAL
Date: 2019.02.28 15:05:31 +05'30'

(विनिता वेद सिंगल)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (महिला व बाल विकास) मंत्रालय, मुंबई
४. मा. सर्व मंत्री /राज्यमंत्री,महाराष्ट्र राज्य
५. मा.विरोधी पक्ष नेता/विधानपरिषद/विधानसभा,महाराष्ट्र विधान भवन,मुंबई
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
८. सचिव (म.व बा.वि.)मंत्रालय,मुंबई
९. सर्व मंत्रालयीन विभाग
१०. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
११. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. आयुक्त तथा राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
१३. सर्व विभागीय आयुक्त (महसूल विभाग)
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हापरिषद)
१६. सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग.
१७. सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद)
१८. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण
१९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र -, मुंबई /नागपूर
२०. महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-, मुंबई/नागपूर
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२२. मे. सिस्टेक आयटी सोल्यूशन प्रा. लि मुंबई
२३. कक्ष अधिकारी (का.४) महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
२४. वित्त विभाग,(व्यय-६) मंत्रालय, मुंबई
२५. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२६. निवड नस्ती(का.६)